दैनिक

MAHILA SANVAD

# महिला संवाद

आवृत्ती : पुणे PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224 इतर आवृत्ती : मुंबई - जालना- छत्रपती संभाजीनगर - सोलापूर - सातारा

संपादक : ज्योती मधुकर आडेकर | कार्यकारी संपादक : विद्या जाधव | उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड

PUNE : Volume No. 1, Issue No. 289, Marathi Daily Thursday, Date - 28 May 2026 Price 2 Rupees, Pages - 4

पुणे अवृत्ती | वर्ष १ ले | अंक २८९ वा | मराठी दैनिक | गुरूवार दि. २८ मे २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४



**महिला प्रतिनिधी पाहिजेत**

जालना आणि पुणे येथून प्रकाशित होणारे महिला संवाद या मराठी वृत्तपत्रासाठी जिल्हा, तालुका आणि सर्कलसाठी महिला प्रतिनिधी पाहिजेत.

सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय आणि भौगोलिक माहिती असणाऱ्यांनी खालील पत्तयावर संपर्क साधावा.

**महिला संवाद**

कार्यालय
दैनिक महिला संवाद,
गांधी चमन, सावित्रीबाई फुले चौक, जालना. 9168567111


# भरधाव डंपरने घेतला शिक्षिकेचा जीव

## सुट्टीत जनगणना अन् भरधाव डंपरची धडक; शिक्षिकेचा जागीच मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

सध्या शाळांना उन्हाळ्याची सुट्टी लागली असतानाही शिक्षकांची शाळा सुरुच असल्याचं दिसून येत आहे. यंदा उन्हाळ्याच्या सुट्टीत शिक्षकांना जणगनणेचं काम कराव लागत असल्याने भरउन्हात दारोदारी भटंकती होत आहे. त्यातच, कामाच्या तणावाने काही शिक्षकांमध्ये नाराजीचा सूरही पाहायला मिळत आहे. दरम्यान, राज्यात जनगणना कामी असलेल्या तीन शिक्षकांचा मृत्यू झाल्याची दु:खद घटना घडली होता. आता, आणखी एका शिक्षिकेचा अपघाती मृत्यू झाल्याचे समोर आलं आहे. मावळ तालुक्यात जनगणनेच्या शासकीय कामासाठी जात असताना एका शिक्षिकेचा भीषण अपघातात मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना कान्हे फाटा येथे घडली आहे. या घटनेनंतर शिक्षक संघटनांनी पुन्हा एकदा जनगणना कामी प्रशासनाविरुद्ध संताप व्यक्त केला आहे.

दीपाली तांबे असे मृत शिक्षिकेचे नाव असून जुना पुणे-मुंबई महामार्गावरील कान्हे फाटा येथे भरधाव डंपरने त्यांच्या मोपेडला जोरदार धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर मावळ तालुक्यातील शिक्षकांमध्ये संतापाची लाट उसळली असून शासकीय सुट्टीच्या दिवशीही जनगणनेच्या कामासाठी शिक्षकांना बोलावले जात असल्यावरुन संताप व्यक्त होत आहे. शिक्षकांना सुट्टीच्या दिवशीही जनगणना कामासाठी बोलवण्यावरुन प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. तसेच, शिक्षिका दीपाली तांबे यांच्या अपघाती







मृत्यूला जबाबदार कोण? असा सवाल शिक्षकांकडून केला जात आहे. तर, महामार्गावर भरधाव डंपर वाहतुकीवर तातडीने निर्बंध आणण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

जनगणना करताना यापूर्वी राज्यातील तीन शिक्षकांचा मृत्यू झाला आहे. कोल्हापुरातील भगवान पाटील आणि सांगोला इथल्या राजाराम ढोले यांचा हृदयविकाराने, तर लातूर मधील सुंदरम वांगसकर यांचा अपघाती मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या दु:खद घटनेनंतर त्यांचे कुटुंबीय उघड्यावर आले आहे. जनगणना करणाऱ्या प्रगणकांचा कर्तव्य बजावताना मृत्यू झाल्यास कुटुंबीयांस १० लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान द्यावे. तसेच कुटुंबीयांना अनुकंपाखाली नोकरी द्यावी अशी मागणी कोल्हापुरातील खाजगी प्राथमिक शिक्षक महासंघाने केली आहे. या बाबतचे निवेदन खाजगी प्राथमिक शिक्षक महासंघांचे अध्यक्ष राजेंद्र कोरे यांनी आजच कोल्हापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते.

## वृद्ध दाम्पत्याचा गळा चिरुन निर्घृण खून

**रायगड । प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुका दुहेरी हत्याकांडाच्या घटनेने हादरला आहे. खालापूर तालुक्यातील निगडोली गावात मंगळवारी ही घटना उघड झाली. या गावातील वृद्ध जोडप्याचा गळा चिरुन निर्घृणपणे खून करण्यात आला आहे. या दोघांचे मृतदेह सापडल्यानंतर निगडोली गावात आणि खालापूर तालुक्यात एकच खळबळ उडाली होती. या वृद्ध जोडप्याची हत्या कोणी केली आणि त्यामागील कारण काय, हे अद्याप समोर आलेले नाही.

प्राथमिक माहितीनुसार, ७५ वर्षीय रघुनाथ फराट आणि त्यांच्या ७२ वर्षीय पत्नी सुरेखा फराट यांचे मृतदेह घरात रक्ताच्या थारोळ्यात आढळून आले. या दोघांच्याही मृतदेहांवर राख आणि




पालापाचोळा टाकण्यात आला होता. रघुनाथ फराट आणि सुरेखा फराट हे दोघेही फोन उचलत नसल्याने त्यांचा नातू निगडोली येतील त्यांच्या घरी पोहोचला. तेव्हा घरात त्याला आपले आजी-आजोबा मृतावस्थेत आढळून आले. या घटनेची वर्दी मिळताच पोलिसांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला. खालापूर पोलिस आणि फॉरेन्सिक पथक यांच्याकडून हत्येमागचा तपास सुरु आहे. अज्ञात आरोपींविरोधात खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून सध्या पुढील तपास सुरु आहे.

## मंत्रालयातच चोरी! मंत्री संजय राठोड यांच्या दालनातून ८० हजारांची रोकड गायब

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचं मुख्य सत्ताकेंद्र असलेल्या मंत्रालयातील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. शिवसेना नेते आणि राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या मंत्रालयातील कार्यालयातून तब्बल ८० हजार रुपयांची रोकड चोरीला गेल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली आहे. अतिसुरक्षित मानल्या जाणाऱ्या मंत्रालयात थेट मंत्र्यांच्याच दालनात चोरी झाल्याने प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. या चोरीच्या घटनेनंतर आता मंत्रालयातील नियमांवरून एक नवीनच राजकीय आणि प्रशासकीय चर्चा रंगू लागली आहे.



नियमांनुसार, मंत्रालयात येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला किंवा कर्मचाऱ्याला आपल्यासोबत १० हजार रुपयांपेक्षा जास्त रक्कम आत घेऊन जाण्यास सक्त मनाई आहे. मुख्य प्रवेशद्वारावरच तपासणी दरम्यान तशा सूचना दिल्या जातात. असे असताना मंत्री संजय राठोड यांच्या शासकीय कार्यालयात तब्बल ८० हजार रुपयांची एवढी मोठी रोकड आली कुठून? आणि ती तिथे का ठेवण्यात आली होती? याबाबत आता उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे. ही रक्कम चोरीला गेल्याचे लक्षात येताच कार्यालयात एकच धावपळ उडाली. रात्री उशिरापर्यंत कसून झाडाझडती घेण्यात आली. मंत्रालयासारख्या व्हीआयपी इमारतीमध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे मोठे जाळे आणि चोख पोलीस बंदोबस्त असतानाही ही चोरी झाली आहे. मात्र, या चोरीच्या घटनेबाबत अद्याप कोणतीही अधिकृत पोलीस तक्रार दाखल करण्यात आलेली नाही. सध्या पोलिसांत अधिकृत गुन्हा दाखल न करता तपास सुरू असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

## नागरी सुविधांच्या नियोजनासाठी महत्त्वाची प्रक्रिया असलेल्या जनगणना मोहिमेला गती

**पिंपरी । प्रतिनिधी**

देशाच्या सामाजिक, आर्थिक आणि नागरी विकासासाठी महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या जनगणना प्रक्रियेत जनगणना कर्मचारी सक्रियपणे योगदान देत आहेत.

शहरातील विविध विभागांतील कर्मचारी सध्या घरभेटीद्वारे माहिती संकलनाचे काम करत असून, अचूक आणि विश्वासार्ह माहिती नोंदविण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने मोहीम राबविली जात आहे. वाढती लोकसंख्या आणि बदलत्या नागरी गरजांच्या पार्श्वभूमीवर भविष्यातील विकास आराखडे तयार करण्यासाठी ही प्रक्रिया महत्त्वाची मानली जात आहे. जनगणना ही केवळ लोकसंख्येची आकडेवारी गोळा करण्यापुरती मर्यादित नसून शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, वाहतूक, निवास, सार्वजनिक सुविधा आणि पायाभूत विकास यांसारख्या क्षेत्रांतील धोरणनिर्मितीसाठी आधारभूत ठरणारी व्यापक प्रक्रिया आहे. नागरिकांकडून संकलित होणाऱ्या माहितीच्या आधारे विविध शासकीय योजना आणि सेवा अधिक परिणामकारकपणे नियोजित केल्या जातात. त्यामुळे माहितीची अचूकता आणि नागरिकांचे सहकार्य या दोन्ही बाबींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

शहरात निवडणूक आचारसंहितेची पार्श्वभूमी आणि काही प्रशासकीय निर्बंध असतानाही नागरिकांना दैनंदिन सेवा सुरळीत मिळाव्यात यासाठी महापालिका प्रशासनाने विभागनिहाय समन्वय आणि पर्यायी नियोजनावर भर दिला आहे. जनगणना जबाबदारी आणि नियमित नागरी सेवा यांचा समतोल राखत प्रशासनाकडून कामकाज सुरू ठेवण्यात येत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

उन्हाळ्याची तीव्रता, बदलते हवामान आणि विस्तीर्ण नागरी क्षेत्र अशा विविध आव्हानांमध्येही जनगणना कर्मचारी सातत्याने घरभेटी घेऊन माहितीचे योग्य संकलन करत आहेत. अनेक भागांत नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधून आवश्यक तपशील नोंदविले जात असून, या प्रक्रियेमुळे शहराच्या लोकसंख्याविषयक आणि सामाजिक वास्तवाचे अधिक अचूक चित्र समोर येण्यास त्यामुळे मदत होणार आहे.

उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी सांगितले की, जनगणना जबाबदारी आणि नियमित नागरी सेवा यांचा समतोल राखत कर्मचारी पार पाडत असलेले हे काम शहराच्या भविष्यातील विकास नियोजनासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असून , जनगणना कर्मचारी अत्यंत समर्पणाने घरभेटीद्वारे माहिती संकलनाचे काम करत आहेत.

जनगणना प्रक्रियेत संकलित होणारी माहिती पूर्णपणे गोपनीय राखली जाते आणि ती केवळ शासकीय नियोजनासाठीच वापरली जाते. नागरिकांनी कोणतीही शंका न बाळगता अचूक व संपूर्ण माहिती द्यावी, यामुळे जनगणना प्रक्रिया अधिक प्रभावी आणि विश्वासार्ह होईल.

पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले की, जनगणना ही केवळ सांख्यिकीय प्रक्रिया नसून शहर आणि देशाच्या विकासाचा मूलभूत आधार आहे. अचूक माहितीच्या आधारेच भविष्यातील पायाभूत सुविधा, नागरी सेवा आणि विविध विकास योजनांचे प्रभावी नियोजन करता येते. त्यामुळे नागरिकांनी जनगणना प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवून प्रशासनाला आवश्यक सहकार्य करावे.

महापालिका प्रशासनाने नागरिकांना जनगणना कर्मचाऱ्यांना आवश्यक सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. प्रगणक घरभेटीसाठी आल्यानंतर त्यांना योग्य आणि संपूर्ण माहिती द्यावी. तसेच जनगणना प्रक्रियेदरम्यान कोणत्याही प्रकारचा ओटीपी मागितला जात नाही, त्यामुळे नागरिकांनी अफवा किंवा गैरसमजांना बळी न पडता अधिकृत जनगणना कर्मचाऱ्यांशी विश्वासाने सहकार्य करावे, असे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या पुण्यतिथीनिमित्त महापालिकेच्या वतीने अभिवादन



**पिंपरी । प्रतिनिधी**

भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस महानगरपालिकेच्या वतीने महापौर रवि लांडगे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीत झालेल्या या कार्यक्रमास उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच विविध विभागातील कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.


तसेच नेहरूनगर येथील भारतरत्न पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या पुतळ्यास उपमहापौर शर्मिला बाबर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर,नगरसदस्य राहूल भोसले, नगरसदस्या सारिका मासुळकर,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

## नवी मुंबई महापालिकेच्या शिष्टमंडळाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मालमत्ता कर प्रणालीची घेतली माहिती

**पिंपरी । प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील मालमत्ता कर व्यवस्थापन अधिक प्रभावी, पारदर्शक आणि महसूलवृद्धीस चालना देण्याच्या उद्देशाने नवी मुंबई महापालिकेच्या शिष्टमंडळाने आज पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाला भेट दिली. यावेळी उपायुक्त सचिन पवार यांनी या शिष्टमंडळाला पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मालमत्ता कर प्रणालीची सविस्तर माहिती दिली.

पिंपरी चिंचवड महापालिकेचे उपायुक्त सचिन पवार यांनी मालमत्ता कर व्यवस्थापनातील विविध प्रक्रिया, महसूलवाढीसाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना तसेच तंत्रज्ञानाधारित प्रणालींबाबत सविस्तर माहिती देताना सांगितले की, मालमत्ता कर व्यवस्थापन अधिक पारदर्शक, तंत्रज्ञानाधारित आणि नागरिककेंद्रित करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका सातत्याने प्रयत्नशील आहे. डिजिटल प्रणाली, जीआयएस सर्वेक्षण आणि कार्यक्षम महसूल व्यवस्थापनाच्या माध्यमातून सेवा अधिक परिणामकारक करण्यावर आमचा भर आहे. विविध महापालिकांमध्ये अशा अभ्यासभेटी आणि अनुभवांची देवाणघेवाण झाल्यास प्रशासनातील उत्तम पद्धती एकमेकांपर्यंत पोहोचतात. त्यामुळे महसूल व्यवस्थापन अधिक सक्षम होण्याबरोबरच नागरिकांना अधिक सुलभ, विश्वासार्हता आणि दर्जेदार सेवा उपलब्ध करून देणे शक्य होते. स्थानिक



स्वराज्य संस्थांनी एकमेकांच्या यशस्वी उपक्रमांचा अभ्यास करून त्यांचा अवलंब करणे ही सकारात्मक आणि विकासाभिमुख प्रक्रिया आहे, असेदेखील त्यांनी सांगितले.

यावेळी नवी मुंबई महापालिकेच्या शिष्टमंडळाने मालमत्ता कर आकारणीची कार्यपद्धती, सर्वेक्षण व पुनर्मूल्यांकन प्रक्रिया, लेटिंग रेट निर्धारण, महसूलवाढीसाठी राबविण्यात येणारे उपक्रम, जनजागृती मोहिमा तसेच डिजिटल प्रणालींच्या वापराबाबत विशेष माहिती जाणून घेतली. तसेच जीआयएस आधारित सर्वेक्षण, थकबाकी वसुलीसाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना आणि नागरिकाभिमुख सेवा अधिक सक्षम करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेकडून राबविण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती देण्यात आली. या अभ्यासभेटीमुळे दोन्ही महापालिकांमध्ये प्रशासनातील सर्वोत्तम पद्धतींची देवाणघेवाण होऊन अधिक कार्यक्षम, तंत्रज्ञानाधारित आणि नागरिकाभिमुख कर व्यवस्थापनाला चालना मिळणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.


**पाहिजेत**

महाराष्ट्रातील निर्भिड आणि निष्पक्ष दैनिक महिला संवाद या वृत्तपत्रासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रतिनिधी पाहिजेत इच्छुकांनी खालील प्रत्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.

अनंत पार्क काळेवाडी रोड राहटणी धनगर बाबा मंदिरा जवळ पुणे शहर पुणे-४३१००३

संपर्क - 9168567111

वरील क्रमांकावर बायोडाटा पाठवावा


## थोडक्यात...

### १००० गावांमध्ये एआयआधारित अलर्ट यंत्रणा - वनमंत्री नाईक

**मुंबई । प्रतिनिधी**

मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी राज्यात पहिल्या टप्प्यात दहा ठिकाणी नियंत्रण कक्ष उभारणे, राज्यातील एक हजार गावांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित अलर्ट यंत्रणा उभारणे तसेच दोन रेस्क्यू सेंटर आणि दहा उपचार केंद्रे उभारण्यास राज्य वन्यजीव मंडळाच्या स्थायी समितीच्या बैठकीत अध्यक्ष तथा वनमंत्री गणेश नाईक यांनी मंजुरी दिली. हा प्रकल्प सुमारे २६० कोटी रुपयांचा असून मानवांवरील वन्यजीवांचे हल्ले रोखण्यासाठी तातडीने या उपाययोजना राबविण्याचे निर्देश मंत्री नाईक यांनी यावेळी दिले.

राज्य वन्यजीव मंडळाच्या स्थायी समितीची बैठक मंत्रालयात वनमंत्री श्री. नाईक यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी आमदार समीर मेघे, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) श्रीनिवास राव, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) एम. श्रीनिवास रेड्डी, उपसचिव निकिता पांडे यांच्यासह समितीचे सदस्य उपस्थित होते. राज्यातील मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्यासाठी आणि मानवी जीवितहानी होऊ नये यासाठी वन विभागाच्या वतीने कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. या आराखड्याअंतर्गत पोलीस नियंत्रण कक्षाच्या धर्तीवर राज्यातील विविध भागांत दहा नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येणार आहेत. हे नियंत्रण कक्ष अत्याधुनिक डिजिटल यंत्रणांनी सुसज्ज असतील. या नियंत्रण कक्षांद्वारे वन विभागाची संसाधने, वाहने आणि गस्ती पथकांचे ट्रॅकिंग करण्यात येईल. मानव-वन्यजीव संघर्षाची परिस्थिती उद्भवल्यास नियंत्रण कक्षाद्वारे संबंधितांना तत्काळ माहिती देऊन आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे, अशी माहिती मंत्री नाईक यांनी दिली. तसेच वनक्षेत्राबाहेर वन्यप्राण्यांचे अस्तित्व आढळल्यास ग्रामस्थांना तत्काळ माहिती मिळावी, यासाठी वनक्षेत्रालगतच्या गावांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित अलर्ट यंत्रणा प्रायोगिक तत्त्वावर उभारण्यात आल्या आहेत. या यंत्रणेची उपयुक्तता लक्षात घेऊन आता ही यंत्रणा राज्यातील सुमारे एक हजार गावांमध्ये उभारण्यात येणार आहे. यामुळे वन्यप्राण्यांच्या हालचालींची माहिती तातडीने ग्रामस्थांना मिळून ते दक्ष राहू शकतील.


याशिवाय पकडलेल्या वन्यप्राण्यांसाठी रेस्क्यू सेंटर उभारण्यात येणार आहेत. तसेच वन्यप्राण्यांवरील उपचारांसाठी दहा ठिकाणी ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटरही उभारण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. वन्यप्राण्यांच्या सुटकेसाठी २० ठिकाणी रॅपिड रेस्क्यू टीमची निर्मिती करण्यात येणार आहे. वनक्षेत्रालगतच्या गावांमध्ये वन्यप्राण्यांपासून संरक्षणासाठी वन विभागाच्या मदतीसाठी दोन हजार प्राथमिक प्रतिसाद दल (प्रायमरी रिस्पॉन्स टीम) तयार करण्यात येणार आहेत. शेतपिकांचे नुकसान करणाऱ्या हरण, माकडे, रानडुक्कर आदी प्राण्यांना पकडण्यासाठी दोन फिरती पथके स्थापन करण्यात येणार आहेत. ज्या ठिकाणी या प्राण्यांचा उपद्रव होत आहे, त्या ठिकाणी जाऊन या प्राण्यांना पकडून त्यांना पुन्हा वनक्षेत्रात सोडण्याचे काम ही पथके करणार आहेत. ही पथके अत्याधुनिक साधनांनी सुसज्ज असतील. तसेच माकडे आणि रानडुकरांची संख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी राज्यात दोन ठिकाणी नसबंदी केंद्रे उभारण्याचा प्रस्ताव आहे.

## संपादकीय...

# शिक्षकांचे जीव धोक्यात

राज्यात सध्या उन्हाळ्याच्या सुट्ट्या सुरू असताना शिक्षक मात्र विश्रांतीऐवजी जनगणनेच्या कामात गुंतलेले दिसत आहेत. शिक्षणाचे मुख्य काम सांभाळणाऱ्या शिक्षकांवर सातत्याने विविध शासकीय जबाबदाऱ्या टाकल्या जातात, ही बाब नवी नाही. पण आता ही जबाबदारी थेट जीवावर बेतू लागल्याने परिस्थिती अत्यंत गंभीर बनली आहे. मावळ तालुक्यात जनगणना कामासाठी जात असताना शिक्षिका दीपाली तांबे यांचा भीषण अपघातात मृत्यू झाला आणि पुन्हा एकदा प्रशासनाच्या धोरणांवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जुना पुणे-मुंबई महामार्गावरील कान्हे फाटा येथे भरधाव डंपरने त्यांच्या मोपेडला धडक दिली आणि एका कर्तव्यदक्ष शिक्षिकेचा जागीच दुर्दैवी अंत झाला. या घटनेने केवळ एका कुटुंबाचा आधार हिरावला नाही, तर संपूर्ण शिक्षक वर्ग हादरून गेला आहे. विशेष म्हणजे, ही घटना एखाद्या वैयक्तिक प्रवासादरम्यान घडलेली नाही; त्या शासकीय जनगणना कामासाठी जात होत्या. त्यामुळे हा केवळ अपघात नसून प्रशासनाच्या कामकाज पद्धतीचा गंभीर परिणाम मानला जात आहे. यापूर्वीही राज्यातील भगवान पाटील, राजाराम ढोले आणि सुंदरम वांगसकर या शिक्षकांचा जनगणना कामादरम्यान मृत्यू झाला आहे. कोणी हृदयविकाराने तर कोणी अपघातात प्राण गमावले. म्हणजेच ही एक-दोन घटनांची मालिका नाही, तर शिक्षकांवर वाढत्या कामाच्या ताणामुळे आणि अपुऱ्या सुरक्षेमुळे निर्माण झालेली धोकादायक परिस्थिती आहे. प्रशासन मात्र या घटनांकडे केवळ आकडेवारी म्हणून पाहत असल्याची भावना शिक्षकांमध्ये निर्माण झाली आहे. प्रश्न असा आहे की, जनगणनेसारख्या महत्त्वाच्या कामासाठी नेहमी शिक्षकांनाच का पुढे केले जाते? शिक्षकांचे मूळ काम विद्यार्थ्यांना शिक्षण देणे हे आहे. मात्र निवडणुका, जनगणना, सर्वेक्षण, आरोग्य मोहिमा, विविध शासकीय अभियानं अशा असंख्य जबाबदाऱ्या त्यांच्यावर टाकल्या जातात. परिणामी अध्यापनावर परिणाम होतोच, पण शिक्षकांचे मानसिक आणि शारीरिक आरोग्यही धोक्यात येते. उन्हाळ्याच्या प्रचंड उकाड्यात घराघरांत जाऊन माहिती गोळा करणे हे किती कठीण आणि जोखमीचे काम आहे, याची जाणीव प्रशासनाला आहे का, असा सवाल आता उपस्थित होऊ लागला आहे. विशेषतः ग्रामीण आणि महामार्ग परिसरात जनगणना करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेची कोणतीही ठोस व्यवस्था नसल्याचे दिसते. ना सुरक्षित प्रवासाची सुविधा, ना विमा संरक्षण, ना वैद्यकीय सुरक्षा. शिक्षक स्वतःच्या वाहनाने जीव धोक्यात घालून शासकीय कर्तव्य बजावत आहेत. अशा परिस्थितीत अपघात झाल्यास जबाबदारी नेमकी कोणाची, हा प्रश्न अनुत्तरितच राहतो.

# वनविभागाचे दुर्लक्ष आणि जंगल तोडीचे वाढते प्रमाण; यामुळेच हिंसक पशुंकडून मानवीय हाणी होत आहे



राज्यासह देशात वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण,सीमेंट रोड,अनिर्बंध बांधकाम व काही ठिकाणी धार्मिकतेच्या नावावर मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत आहे आणि ही बाब सरकार उघड्या डोळ्यांनी पाहत आहे तरीही काणावर हात आणि तोंडावर बोट ठेवून बघ्यांच्या भुमिकेत असतांना दिसते.याचाच परिणाम आज हिंसक पशु (वाघ, बिबट्या,अस्वल,) यांची मानवावर व पाळीव प्राण्यांनवर आक्रमकता वाढल्याचे दिसून येते.सरकार दरवर्षी सांगत असते की, हजारो कोटींच्या झाडांचे वृक्षलागवड केली.परंतू प्रत्यक्षात वृक्षलागवड झालीच नसते फक्त ती कागदावरच झाल्याचे दिसून येते.आज सरकारने जंगल कटाई करून औद्योगिकरण, शहरीकरण व सिमेंट रोडचे मोठ्या प्रमाणात जाळे विणले व याचा दुष्परिणाम हळूहळू सर्वत्र जाणवत आहे.

अशा परिस्थितीत सरकार झाडांची लागवड कुठे करीत आहे ही बाब समजण्यापलीकडची असल्याचे मला वाटते.सरकारकडून होणारी वृक्षलागवड १०० टक्या पैकी ८० टक्के लागवड फक्त कागदावरच असल्याचे वरील घटनांवरून दिसून येते.आज जंगल तोडीच्या कारणांमुळेच चंद्रपूर जिल्ह्यातील गुंजेवाही परिसरात वाघाच्या हल्यात चार महिलांचा बळी गेल्याचे दिसून येते. सिंदेवाही वनपरिक्षेत्रातील गुंजेवाहीच्या जंगलात दिनांक २२ मे २०२६ ला सकाळी तेंदूपत्ता संकलनासाठी गेलेल्या महिलांवर वाघाने हल्ला करून चौघींना जागीच ठार केले. अशीच घटना मागील वर्षी मे महिन्यातच तेंदूपत्ता संकलनासाठी गेलेल्या तीन महिलांना वाघाने हल्ला करून ठार मारले होते.अशा भयानक घटना सरकारच्या डोळ्यासमोर असुन सुद्धा जंगलतोड थांबलेली नाही व तेंदूपत्ता संकलन करणाऱ्या मजुरांना सरकारने कोणतेही संरक्षण दिलेले नाही हा अत्यंत चिंतेचा विषय आहे.आज जगातील सर्वात जास्त उष्ण शहरांच्या बाबतीत विचार केला तर भारतातील ५० शहरांमध्ये सुर्य आग ओकत आहे ही देशासाठी मोठी धोक्याची घंटा म्हणावी लागेल.कारण दिवसेंदिवस देशातील तापमान मोठ्या प्रमाणात वाढतच आहे.दिल्ली,यूपी, मध्यप्रदेश, महाराष्ट्रात पुढील ७ दिवस तापमानात वाढ होणार असल्याचे सांगितले जाते.त्यामुळे या राज्यातील अनेक शहरे रेड अलर्ट वर आहेत.

आज महाराष्ट्रासह देशातील अनेक शहरांचे तापमानाने आपली संपूर्ण सिमा रेषा ओलांडली असून बहुतांश भागात ४५ अंश सेल्सिअस पार झाल्याचे दिसून येते.आज उष्णतेने संपूर्ण विदर्भ होरपळत आहे वर्धा-४७.१, ब्रम्हपुरी -४७.२, नागपूर -४६.६, अमरावती -४६.४, चंद्रपूर -४६.२ आणि इतर शहरांनी तापमानाचा उच्चांक गाठून ४५ अंश सेल्सिअस पार केल्याचे दिसून येते.यामुळेच हिंसक पशुंना पाण्यासाठी वणवण हिंडावे लागत.कारण जंगलातील पाणथड्या सुध्दा आटल्या आहेत. बदलत्या हवामानामुळे, वाढत्या तापमानामुळे आणि जंगलतोडीमुळे जंगलातील पशुपक्षांसाठी असणारा पाणीसाठा संपुष्टात आल्याने वाघ-बिबट्या सारखे हिंसक पशुं गावाकडे किंवा गावांच्या आसपासच्या परिसरात किंवा शहराकडे धाव घेतांना दिसतात. त्यामुळे आज चंद्रपूर जिल्ह्यातील गुंजेवाही परिसरात चार महिलांचा वाघाच्या हल्यात बळी गेल्याचे दिसून येते.मागील पाच वर्षांत चंद्रपूर जिल्ह्यात २०२१-२५ दरम्यान २०० जणांचा वन्यजीव हल्यात मृत्यू झाला आणि चालू वर्षातील पाच महिन्यांतील आकडा १९ वर येवून पोहोचला आहे.अशा प्रकारे आतापर्यंत २१९ जणांचा बळी गेला. परंतु सरकारने यावर ठोस उपाययोजना अजुन पर्यंत केलेली ही शोकांतिका म्हणावी लागेल.

अशा गंभीर घटनांवर सरकारने कायमस्वरूपी उपाय योजना अमलात आणावी लागेल तेव्हाच हिंसक पशुंवर नियंत्रण ठेवता येईल. कारण वनविभाग आणि शासनाकडून प्रत्यक्ष उपाययोजनांचा अभाव असल्याने मोठ्या जीवीत हाणी होत आहे याचे जिवंत उदाहरण चंद्रपूरमध्ये दिसून आले हा अत्यंत चिंतेचा व गंभीर विषय आहे.आज जंगल तोडीमुळे हिंसक पशुं मानव व पाळीव प्राण्यांनवर हल्ले करीतच आहेत सोबतच जंगल तोडीचा परिणाम पाण्याची समस्या,अकाल इत्यादी अनेक गोष्टींशी निगडीत असल्याने पुढे चालून याचे गंभीर परिणाम पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवजंतूंना भोगावे लागतील.कारण वाढत्या तापमान व ढासळती वनसंपदा यामुळेच हिंसक पशुंनी मानवावर आक्रमणाचा पवित्रा घेतल्याचे स्पष्ट दिसून येते.गेल्या अनेक वर्षांपासून चंद्रपूर जिल्ह्यात तेंदूपत्ता संकलन सुरू आहे.या संकलनातून दरवर्षी ३५ हजार कुटुंबांना रोजगार मिळतो. उन्हाळ्यात शेतीची कामे नसल्याने अनेक कुटुंबे जंगलात जाऊन तेंदूपत्ता संकलन करतात व आपला उदरनिर्वाह करतात.ही बाब वनविभाग व सरकारला चांगल्याप्रकारे ग्यात असतांना सुध्दा मजुरांना हिंसक पशुंपासुन सरकार संरक्षण करू शकत नाही ही अत्यंत दुर्दैवी बाब म्हणावी लागेल.

महाराष्ट्रात वन्यजीव प्राण्यांच्या हल्याने वाढती जीवीत हाणी अत्यंत चिंताजनक आहे यामध्ये २०२० मध्ये ९३ लोकांचा बळी गेला,२०२१ मध्ये ११८, २०२२ मध्ये १३४,२०२३ मध्ये-१४७,२०२४मध्ये-१६७ आणि २०२५ मे पर्यंत ७२ जणांचा मृत्यू हिंसक पशुमुळे झाला आहे.

ही संपूर्ण मानवीय हाणी जंगल कटाईमुळे निर्माण झालेली मोठी समस्या आहे यावर सरकारने ताबडतोब उपाययोजना करणे गरजेचे आहे.वन्य प्राण्यांना (विशेषतः बिबट्यां,वाघ) वन्यप्राण्यांपासुन मानवी हाणी रोखण्यासाठी महाराष्ट्राचे वनमंत्री गणेश नाईक यांनी जंगलात शेळ्या सोडण्याचे म्हटले होते.तरीही वन्यप्राण्यांकडून मोठ्या प्रमाणात मानवी हाणी होतांना आपण पहातो ही अत्यंत गंभीर बाब आहे. हिंसक प्राण्यांपासून होणारी मानवीय हाणी याचे गांभीर्य लक्षात घेऊन सरकारने यावर तातडीने उपाययोजना करावीत.जय हिंद.

**- रमेश कृष्णराव लांजेवार**

# पोर्शे अपघात प्रकरणातील विशाल अग्रवालचा पार्टी व्हिडीओ व्हायरल; सोशल मीडियावर संताप

**पुणे । प्रतिनिधी**

काही महिन्यांपूर्वी पुण्यात दारुच्या नशेत भरधाव गाडी चालवून दोघांचा जीव घेणाऱ्या धनिकपुत्राचे प्रकरण राज्यभरात चांगलेच गाजले होते. हा मुलगा अल्पवयीन होता. त्याचे वडील पुण्यातील बडे बांधकाम व्यावसायिक होते. दोघांना गाडीने उडवून त्यांचा जीव घेतल्यानंतर पुणे पोलिसांनी या धनिकपुत्राला अटक केली होती.

त्यानंतर आपल्या मुलाच्या रक्तात मद्याचा अंश आढळू नये, यासाठी विशाल अग्रवाल याने ससून रुग्णालयात डॉक्टर आणि शिपायामार्फत रक्ताच्या नमुन्यांची अदलाबदल केली होती. हे प्रकरण समोर आल्यानंतर एकच खळबळ उडाली होती. यानंतर विशाल अग्रवाल याला या प्रकरणात आरोपी करुन त्याची रवानगी तुरुंगात करण्यात आली होती. मात्र, महिनाभरापूर्वी न्यायालयाने विशाल अग्रवाल याची जामिनावर सुटका केली. त्यानंतर विशाल अग्रवाल आणि त्याच्या कुटुंबीयांनी जंगी पार्टी केली. या पार्टीचा व्हिडीओ सध्या सोशल मिडियावर व्हायरल होत असून त्यामध्ये अग्रवाल कुटुंबीयांचा मस्तवालपणा कायम असल्याचे दिसून येत आहे.

या व्हिडीओत विशाल अग्रवाल आणि त्याची पत्नी पार्टीमध्ये नाचताना दिसत आहेत. या दोघांच्या गळ्यात कोऱ्याकरकरीत नोटांचे हार घातल्याचे दिसत आहे. अग्रवाल कुटुंबीय मुंबई से आया मेरा दोस्त, दोस्तो सलाम करो या गाण्यावर बेफाम होऊन नाचताना दिसत आहेत. विशाल अग्रवाल याच्या एका नातेवाईकाने त्याला उचलून घेतल्याचेही दिसत आहे.

हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून त्यावरुन संताप व्यक्त केला जात आहे.



पुण्यातील पोर्शे अपघात प्रकरणात दोन तरुणांचा जीव गेला होता. यानंतर पोलिसांनी विशाल अग्रवालच्या अल्पवयीन मुलाला अटक केली होती. पुणे पोलिसांनी विशाल अग्रवाल यांच्या मुलाला पोलीस ठाण्यात पिझ्झा-बर्गर पुरवण्याइतप विशेष वागणूक दिली होती. तसेच या धनिकपुत्राला वाचवण्यासाठी ससून रुग्णालयातील डॉक्टरांनी रक्ताचे नमुने बदलले होते.

धनिकपुत्राचे वडील विशाल अग्रवाल, आजोबा सुरेंद्र अग्रवाल यांनी आपल्या ड्रायव्हरला धमकावण्यापासून ते पैसे दाबण्यापर्यंत शक्य ते सर्व प्रयत्न करुन पाहिले. मात्र, हे सर्व प्रयत्न फोल ठरले होते.

यानंतर विशाल अग्रवाल फरार झाला होता. मात्र, पोलिसांनी शोधमोहीम राबवून त्याच्या मुसक्या आवळल्या होत्या. तेव्हापासून विशाल अग्रवाल तुरुंगात होता. त्यावेळी विशाल अग्रवाल यांचा मुलगा अल्पवयीन असल्याने त्याला तुरुंगातून सोडण्यात आले होते. यानंतर आता विशाल अग्रवाल हादेखील तुरुंगातून बाहेर आला आहे.

# इंधन संकटानंतर कांद्याचा मुद्दा गाजला; फडणवीस-विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप

**मुंबई । प्रतिनिधी**

इराण आणि अमेरिका युद्धाचे परिणाम भारतात बघायला मिळत आहेत. पेट्रोल आणि डिझेलचा तुटवडा बघायला मिळतोय. यादरम्यानच सरकारकडून मोठे निर्णय घेतले जात आहेत.

पेट्रोल आणि डिझेलच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. त्यामध्ये राज्यात काही जिल्ह्यांमध्ये पेट्रोल आणि डिझेलचा तुटवडा निर्माण झाला. इंधन दरवाढीमुळे अनेक गोष्टींवर परिणाम होत आहे. कालच पेट्रोल आणि डिझेलच्या भावात वाढ झाली. आज सीएनजीचे भाव वाढले. जर इराण आणि अमेरिका युद्ध पुढील काही दिवस चालले तर त्याचे वाईट परिणाम जगातील अनेक देशांना भोगावे लागतील. मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटले होते की, राज्यात पुढील एक महिना पुरेल इतका पेट्रोल आणि डिझेलचा साठा आहे. काही जिल्ह्यांमध्ये पेट्रोल आणि डिझेलचा तुटवडा होण्यामागची कारणेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितली.

नुकताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कांद्याच्या मुद्द्यावर मोठे विधान केले. देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले की, कांद्याच्या दरात कालच केंद्राकडून ३.५०पैसे वाढ करण्यात आली. कांदा प्रश्नी उद्या संध्याकाळी दिल्लीत बैठक होणार आहे. काही लोक विनाकारण यासंदर्भात राजकारण करु पाहतायत. तुमच्या काळात कांद्याचा दराचा प्रश्न होता.

विरोधकांचं आंदोलन राजकीय आंदोलन असल्याचेही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. पुढे त्यांनी म्हटले की, कांदा कापल्यावर अश्रू येणार नाही अशी लोक आंदोलन करतायत. उद्या दिल्लीत कांद्यासंदर्भात बैठक आहे. कांदा कापल्यावरही विरोधकांच्या डोळ्यात अश्रू येणार नाहीत, असेही त्यांनी म्हणत जोरदार टीका केली.

कांद्याच्या मुद्द्यावर आमदार रोहित पवार आक्रमक भूमिका घेत आहेत. त्यांनी सरकारवर जोरदार टीका केली. रोहित पवार यांनी नुकताच यावर म्हटले की, शेतकऱ्यांच्या कांद्याला हमीभाव मिळावा म्हणून आज शेतकऱ्यांची एकजूट झाली. शेतकरी संघटनेसह विरोधी पक्षाचे नेते उपस्थित आहे.

कांद्याला ५ ते सहा रुपये भाव मिळत आहे. हा दर परवडणारा नाही १८ रुपये उत्पादन खर्च आहे. आता कांद्या प्रकरणात दिल्लीमध्ये महत्वाची बैठक पार पडणार आहे.


# सोशल मीडियावर प्रेमाचं जाळं; तरुणींच्या नावावर लाखोंची कर्जफसवणूक

**मुंबई । प्रतिनिधी**

सोशल मीडियाच्या माध्यमातून तरुणींशी ओळख वाढवून, त्यांना प्रेमाच्या जाळ्यात ओढायचं आणि नंतर त्यांचा विश्वास संपादन करून त्यांच्याच नावावर लाखो रुपयांचे कर्ज काढून फसवणूक करणाऱ्या एका सराईत भामट्याला मानपाडा पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. आदर्श म्हात्रे असे या आरोपीचं नाव असून, त्याच्या या भामटेगिरीमुळे डोंबिवली आणि पनवेल परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

या आरोपीला यापूर्वी नवी मुंबई पोलिसांनी अटक केली होती. मात्र, आता डोंबिवलीतील एका पीडित तरुणीने तक्रार दाखल केल्यानंतर मानपाडा पोलिसांनी त्याला गुन्ह्याच्या तपासासाठी ताब्यात घेतलं आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पनवेल परिसरात राहणारा आदर्श म्हात्रे हा सोशल मीडियाच्या विविध प्लॅटफॉर्मवरून तरुणींशी संपर्क साधत असे. सुरुवातीला गोड बोलून मैत्री करायची आणि त्यांचा विश्वास संपादन करायचा, हा त्याचा ठरलेला पॅटर्न होता. एकदा का तरुणी विश्वासात आली की, तिच्याशी प्रेमसंबंध निर्माण करायचे. त्यानंतर वेगवेगळ्या बँकांमध्ये संबंधित तरुणींच्या नावावर आणि कागदपत्रांवर हा भामटा लाखो रुपयांची कर्जे (डेरपी) काढून त्यांची फसवणूक करत होता.

पोलिसांच्या प्राथमिक तपासात या गुन्ह्याची व्याप्ती पाहून अधिकारीही चक्रावून गेले आहेत. आदर्श म्हात्रे याने आतापर्यंत तब्बल १४० हून अधिक तरुणींना आपल्या जाळ्यात ओढल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. यापैकी ११ धाडसी तरुणींनी स्वतः पुढे येऊन वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात त्याच्याविरोधात अधिकृत गुन्हे दाखल केले आहेत. आरोपी म्हात्रे सध्या मानपाडा पोलिसांच्या कोठडीत असून त्याची कसून चौकशी केली जात आहे.



या संपूर्ण फसवणुकीच्या प्रकरणात एक अत्यंत धक्कादायक बाब समोर आली आहे. आदर्श म्हात्रे याच्या फसवणुकीला बळी पडलेल्या अनेक महिला या उच्चशिक्षित असून विविध नामांकित क्षेत्रांमध्ये मोठ्या पदांवर कार्यरत आहेत. यामध्ये आर्थिक क्षेत्र कॉर्पोरेट कंपन्या आणि व्यावसायिक क्षेत्रातील महिलांची संख्या लक्षणीय आहे. आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या महिलांना तो जाणीवपूर्वक टार्गेट करत असल्याचे तपासातून स्पष्ट झाले आहे.

नवी मुंबई पोलिसांनी केलेल्या कारवाईनंतर डोंबिवलीतील एका पीडित तरुणीने मानपाडा पोलिसात धाव घेतली होती. त्यानुसार पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले असून त्याच्याविरोधातील इतर गुन्ह्यांचा तपास सुरू आहे. या भामट्यामुळे आणखी काही पीडित महिला व तरुणी तक्रार देण्यासाठी पुढे येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे फसवणुकीचा हा आकडा आणि एकूण रक्कम आणखी वाढण्याची शक्यता आहे. या घटनेमुळे सोशल मीडियावरील ओळखी आणि ऑनलाईन नातेसंबंधांमधील धोके पुन्हा एकदा समोर आले आहेत.

# नितेश राणेंना आता कोणी सिरीयस घेत नाही; इद्रीस नायकवडींचा घणाघात

**मुंबई । प्रतिनिधी**



मंत्री नितेश राणे यांनी बकरी ईदवर प्रतिक्रिया देताना वादग्रस्त वक्तव्य केलं होतं. या वक्तव्यानंतर आता वातावरण चांगलंच तापल्याचं पहायला मिळत आहे. विरोधकांकडून तर नितेश राणे यांच्यावर टीकेची झोड उठवण्यात आलीच आहे. परंतु आता त्यासोबतच महायुतीचा घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून देखील राणे यांना घरचा आहेर देण्यात आला आहे. नितेश राणे यांच्या या विधानावर बोलताना राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार इद्रीस नायकवडी यांनी राणे यांच्या या वक्तव्याचा चांगलाच समाचार घेतला आहे. राणे यांच्यावर जोरदार टीका केली आहे.

मंत्री नितेश राणेंना आता कोणी सिरीयस घेत नाही, एंटरटेनमेंट साधन म्हणून त्यांच्याकडे बघितलं जातं, असा टोला राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार इद्रीस नायकवडी यांनी नितेश राणे यांना लगावला आहे. बकरी ईदच्या कुर्बानीवरून नितेश राणे यांनी केलेल्या विधानावरून इद्रीस नायकवडी यांनी राणे यांच्यावर जोरदार टीका केली आहे. त्याचबरोबर नितेश राणे यांनी आम्हाला धार्मिक तत्वे कसे पाळावे याचे मार्गदर्शन करण्याची गरज नाही, समाजात दुफळी निर्माण करून, हिरो म्हणून पुढे येण्यासाठी त्यांचा सातत्याने बालिशपणाचा प्रयत्न सुरू आहे, अशी टीका देखील आमदार नायकवडी यांनी यावेळी केली.

दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, मुस्लिम समाजाकडून गाईला राष्ट्रीय पशु म्हणून जाहीर करण्याची मागणी होत आहे. या मागणीकडे सरकारने गंभीरपणे लक्ष देऊन, गाय राष्ट्रीय पशु म्हणून जाहीर करावा, अशी मागणी देखील त्यांनी यावेळी केली, ते सांगलीमधील मिरज येथे बोलत होते. दरम्यान आता इद्रीस नायकवडी यांनी नितेश राणे यांच्यावर केलेल्या टीकेनंतर वातावरण आणखी तापण्याची शक्यता आहे. नितेश राणे हे नायकवडी यांना काय प्रत्युत्तर देणार हे पहाणं महत्त्वाचं ठरणार आहे.

# राईस मिल कामगारांना किमान वेतन द्यावे - मंत्री आकाश फुंडकर

**मुंबई । प्रतिनिधी**

राईस मिलमध्ये काम करणाऱ्या कामगारांना कायद्यानुसार किमान वेतन देण्यात यावे, असे निर्देश कामगार मंत्री ड.आकाश फुंडकर यांनी दिले. मंत्रालयात आयोजित बैठकीत कामगार मंत्री बोलत होते. बैठकीस कामगार आयुक्त एच. पी. तुम्मोड, उपसचिव स्वप्नील कापणीस आणि दीपक पोकळे, भारतीय मजदूर संघाच्या विदर्भ प्रांताचे गटलेवार उपस्थित होते. तर नागपूर येथील अतिरिक्त कामगार आयुक्त दहीफळकर यांनी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे बैठकीत सहभाग घेतला.

कामगार मंत्री म्हणाले, राईस मिल असलेल्या संबंधित जिल्ह्यातील कामगार विभागाच्या अधिकाऱ्यांनी आपल्या स्तरावर तातडीने संयुक्त बैठक घेऊन हा प्रलंबित असलेला मुद्दा निकाली काढावा, तसेच राईस मिल कामगारांच्या संघटनांसोबतही स्वतंत्र बैठका घेऊन त्यांचे प्रश्न सोडविण्यात यावेत.



गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील राईस मिल कामगारांची नोंदणी करण्यासाठी निरीक्षक देण्यात येणार आहेत. माथाडी मंडळात कामगारांची नोंदणी करण्याची प्रक्रिया सुलभ व गतीमान व्हावी, यासाठी निरीक्षकाची थेट जबाबदारी सक्षम अधिकाऱ्यांवर सोपवण्यात येणार आहे. कामगार विभागाच्या आगामी नवीन पदभरतीमध्ये पूर्व विदर्भातील पदे प्राधान्याने भरली जातील, असे कामगार मंत्री ड.फुंडकर यांनी सांगितले. पूर्व विदर्भातील भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर राईस मिल उद्योग पसरलेला आहे. येथील कामगारांच्या विविध समस्यांवर या बैठकीत सविस्तर करण्यात आली.

## थोडक्यात

### राज्यपालांच्या पुढाकाराने 'टीबीमुक्त मुंबई' अभियान

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकभवनाच्या पुढाकाराने बृहन्मुंबई महानगरपालिका मंगळवारपासून 'टीबी मुक्त मुंबई' अभियान सुरु करीत असून अभियानाचा आरंभ राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या उपस्थितीत मंगळवारी सकाळी ११ वाजता (दि. २६ मे) धारावी व सायन येथे होणार आहे.

मुंबईच्या महापौर रितू तावडे, उपमहापौर संजय घाडी व महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे यांच्या उपस्थितीत धारावी येथील एकनाथराव गायकवाड नागरी आरोग्य केंद्र येथे तसेच ११.३० वाजता सायन येथील लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रूग्णालय येथे अभियानाची सुरुवात करण्यात येणार आहे. यावेळी राज्यपालांच्या हस्ते क्षयरूग्णांना पोषण आहार किटचे वाटप देखील करण्यात येणार आहे.

### जवाहर बालभवनाच्या परिसरात मुक्त विज्ञान उद्यान उभारणार -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईच्या चर्नी रोड परिसरातील महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवनाच्या परिसरात 'मुक्त विज्ञान उद्यान' उभारण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते बालभवनच्या नूतनीकृत इमारतीचे लोकार्पण करण्यात आले.

उद्घाटन प्रसंगी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, कौशल्य, रोजगार आणि नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार दीपक केसरकर, मुंबईच्या महापौर रितू तावडे, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण विभागाचे आयुक्त सचिन्द्र प्रताप सिंह, बालभवनच्या संचालक नीता पाटील यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

बालभवनच्या नूतन वास्तूची पाहणी केल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महानगरपालिका शाळांमधील अधिकाधिक विद्यार्थ्यांना या केंद्राशी जोडण्यासाठी महापौर रितू तावडे यांनी पुढाकार घ्यावा. यातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हातभार लागेल.

यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, बालभवन ही केवळ इमारत नसून लाखो मुलांच्या स्वप्नांना आकार देणारे प्रेरणास्थान आहे. नवीन वास्तुमुळे महाराष्ट्रातील बालकांच्या कल्पकतेला नवे पंख मिळतील. मुलांना बालभवनाच्या माध्यमातून खेळ, गायन, नृत्य, चित्रकला, शिल्पकला आणि विविध सृजनशील उपक्रमांद्वारे स्वतः ला शोधण्याची संधी येथे मिळते; तसेच त्यांना मातीशी, रंगांशी आणि संगीताशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य बालभवन गेली ७५ वर्षे सातत्याने काम करत आहे.

शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी सांगितले की, ४ ते १६ वयोगटातील मुलांच्या कल्पनाशक्तीला आणि सृजनशीलतेला वाव देण्याचे कार्य ही संस्था सातत्याने करत आहे. नूतनीकरण करण्यात आलेल्या या इमारतीत तळमजल्यावर अत्याधुनिक प्रेक्षकगृह आणि सुसज्ज ग्रंथालय तयार करण्यात आले आहे. पहिल्या मजल्यावर नृत्य दालन, नाट्य कक्ष आणि संगीत कक्ष आहे. दुसऱ्या मजल्यावर विद्यार्थ्यांच्या सादरीकरणासाठी व्यासपीठ; तसेच मूर्तिकला आणि चित्रकला दालने उभारण्यात आली आहेत.

या वास्तूमध्ये १०० विद्यार्थी क्षमतेची तीन सुसज्ज सभागृहे आहेत. एकाच वेळी ५०० विद्यार्थी विविध कलांचे प्रशिक्षण घेऊ शकतील. दररोज ५०० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण क्षमतेनुसार महिन्याला सुमारे १० हजार, तर वर्षभरात जवळपास १ लाख विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व मार्गदर्शन मिळू शकणार आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात एक बालभवन सुरू करण्याचा शालेय शिक्षण विभागाचा मानस आहे, असे शालेय शिक्षण मंत्री भुसे यांनी सांगितले.

यावेळी सर जे. जे. कला महाविद्यालय आणि महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवन यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. बालभवनच्या संचालक नीता पाटील आणि सर जे. जे. कला महाविद्यालयाचे संचालक किशोर इंगळे; तसेच कुलसचिव शशिकांत काकडे यांच्यात सामंजस्य कराराच्या प्रतींचे आदानप्रदान करण्यात आले. या करारामुळे विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे कला प्रशिक्षण आणि मार्गदर्शन मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

# रक्षक चौक येथील वाहतूक पर्यायी मार्गाने उपलब्ध

## वाहनचालकांनी वेगमर्यादा आणि वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याचे महापालिकेचे आवाहन

**पिंपरी । प्रतिनिधी**

सांगवी फाटा ते किवळे रस्त्यावरील रक्षक चौक येथे उभारण्यात आलेल्या भुयारी मार्गाचे काम पुर्णत्वाकडे आले आहे. सध्या पर्यायी मार्गाने वाहतूक उपलब्ध असून या प्रकल्पाचे सर्व सुरक्षा निकष पूर्ण करण्यात आले आहेत. या प्रकल्पासाठी नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेच्या माध्यमातून सुरक्षा तपासणी करण्यात आली आहे. तसेच वाहतूक सुरक्षिततेचा सर्वंकष आढावा घेण्यासाठी वाहतूक मंत्रालय तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे नोंदणीकृत असलेल्या मान्यताप्राप्त सुरक्षा लेखापरीक्षण सल्लागार संस्थेची नियुक्ती करण्यात आलेली होती.

याशिवाय, सल्लागार संस्थेकडून कामाच्या ठिकाणाची प्रत्यक्ष पाहणी, सर्वेक्षण आणि सखोल अभ्यास करण्यात आला आहे. त्यांच्या अहवालानुसार भुयारी मार्ग आणि त्यास जोडलेल्या रॅम्पच्या सुरक्षिततेसाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. तसेच भुयारी मार्ग आणि त्याच्या दोन्ही बाजूंच्या उतार रस्त्यांवर वाहनांना एकमेकांना ओलांडण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच इंडियन रोड काँग्रेस (आय.आर.सी) च्या मानकांनुसार सुरक्षित वेगमर्यादा दर्शविणारे ताशी ३० किलोमीटर वेगमर्यादेचे अनिवार्य फलक योग्य ठिकाणी बसविण्यात आले आहेत.

भुयारी मार्ग व त्याच्या दोन्ही बाजूंच्या रॅम्पवर संथ गतीने चालणारी वाहने, सायकलस्वार आणि पादचारी यांना प्रवेश प्रतिबंधित करण्यात आला असून त्यांच्यासाठी स्वतंत्र समतल सेवा रस्त्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे सदर मार्ग हा केवळ मोटार वाहनांच्या वाहतुकीसाठी राखीव ठेवण्यात आला आहे. तसेच बस जलद वाहतूक व्यवस्थेसाठी ताशी ३० किलोमीटर सुरक्षित वेगमर्यादेसह स्वतंत्र मार्गिका निश्चित करण्यात आली आहे.

उताराच्या रस्त्यांवर वेग नियंत्रणासाठी आवश्यक त्या सर्व ठिकाणी भारतीय मानांकनानुसार आडव्या पट्ट्यांचे चिन्हांकन करण्यात आले आहे. तसेच वाहनचालकांना सतर्क करण्यासाठी मार्ग एकत्र येणाऱ्या आणि विभाजित होणाऱ्या ठिकाणी तसेच धोकादायक ठिकाणी सौरऊर्जेवर चालणारे पिवळे दिवे बसविण्यात आले आहेत. या उपाययोजनांमुळे वाहनचालकांना वेग कमी करण्याचा इशारा मिळून अपघाताचा धोका कमी होण्यास मदत होणार आहे.

रात्रीच्या वेळी दृश्यमानता वाढविण्यासाठी संरक्षक कठड्यांवर मध्यदर्शक बसविण्यात आले आहेत. या मध्यदर्शकांवर भारतीय मानांकनानुसार पिवळ्या रंगाची प्रकाश परावर्तित करणारी पट्टी बसविण्यात आली आहे. याशिवाय संपूर्ण पुलावर ताशी ३० किलोमीटर वेगमर्यादा दर्शविणारे वाहतूक नियंत्रण फलक लावण्यात आले आहेत, अशी माहिती स्थापत्य प्रकल्प विभागाकडून देण्यात आली आहे.

सांगवी-किवळे रस्त्यावरील रक्षक चौक येथे बांधण्यात आलेल्या भुयारी मार्गाच्या दोन्ही रॅम्पसंदर्भातील सुरक्षा तपासणीतील सर्व बाबी पूर्ण करण्यात आल्या आहेत. नागरिकांनी या मार्गावर ताशी ३० किलोमीटर वेगमर्यादेचे पालन करावे तसेच वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळावेत.

- प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

सांगवी-किवळे रस्त्यावरील रक्षक चौक येथे उभारण्यात येत असलेल्या भुयारी मार्गाचे काम पुर्णत्वाकडे आले असून सध्या पर्यायी मार्गाने वाहतूक सुरू आहे. वाहतूक कोंडी कमी होऊन अडथळाविरहीत प्रवासासाठी हा भुयारी मार्ग सोयीचा ठरणार आहे. नागरिकांनी वेगमर्यादा आणि वाहतुकीचे नियम पाळणे बंधनकारक आहे. तसेच बीआरटीएस मार्गिकांमध्ये खासगी चारचाकी, दुचाकी वाहनांनी प्रवेश करू नये व वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे.

- कुलदीप जंगम, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## ४५ हजारांची लाच घेताना ग्राम महसूल अधिकारी अटकेत

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात गेल्या काही महिन्यात एसीबीने कारवाईचा धडका लावला असून शिपायापासून ते तहसीलदार, उपजिल्हाधिकाऱ्यापर्यंतच्या सनदी अधिकाऱ्यांना लाच घेताना रंगेहात अटक केलीय. त्यामुळे, प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली असून एसीबी कारवाईचा धाक प्रशासनातील अधिकाऱ्यांना बसल्याचे पाहायला मिळत आहे. मात्र, दुसरीकडे अद्यापही लाचखोर कर्मचारी, अधिकारी एसीबीच्या गळ्याला लागत आहेत. आता, पालघर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) पेल्हार ग्रामपंचायतीच्या ग्राम महसूल अधिकारी उज्वला प्रवीण पाटील यांना ४५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात अटक केली. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.



पालघरमधील कारवाईसंदर्भात एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदाराने बिलालपाडा येथील सर्व्हे क्रमांक १३/०३ वरील जमिनीवर माती भरणी केली होती. तसेच रूम बांधकामासंदर्भातील पंचनामा न करण्यासाठी आणि संबंधित प्रकरणात सहकार्य करण्याच्या बदल्यात उज्वला पाटील यांनी एकूण १ लाख ९५ हजार रुपयांची लाच मागितली होती. त्यापैकी १ लाख ५० हजार रुपये माती भरणीच्या पंचनाम्यासाठी, तर ४५ हजार रुपये रूम बांधकामाचा पंचनामा टाळण्यासाठी मागण्यात आल्याचे तपासात स्पष्ट झाले. तक्रारदाराच्या तक्रारीनंतर एसीबीने सापळा रचून पहिला हप्ता स्वीकारताना उज्वला पाटील यांना पकडले.

याप्रकरणी पेल्हार पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने १० दिवसांपूर्वीच नवी मुंबईत लाचप्रकरणात मोठी कारवाई केली असून सिडकोच्या भूमी व भूमापन अधिकाऱ्याला अटक करण्यात आली. अप्पर जिल्हाधिकारी रामदास जगताप यांना २२ हजारांची लाच घेताना एसीबीच्या अधिकाऱ्यांनी रंगेहाथ पकडलं होतं. रामदास जगताप याला सिडको कार्यालयातच रंगेहाथ अटक करण्यात आल्याने सिडकोसह प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली. नवी मुंबई एसीबीकडून अप्पर जिल्हाधिकाऱ्यांविरुद्ध अटकेची कारवाई करण्यात आली असून या कारवाईने प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले.

## पुणे विभाग राज्य उत्पादन शुल्क विभागाची मोठी कारवाई; २.०३ कोटींचा अवैध मद्यसाठा जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे विभाग राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध मद्य वाहतूक आणि साठ्याविरोधात मोठी कारवाई करत सुमारे रु. २ कोटी ३ लाख ३९ हजार ८०० किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत १ हजार ७१६ बॉक्स अवैध मद्यसाठा आणि दोन ६ चाकी कंटेनर वाहने जप्त करण्यात आली.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ. राजेश देशमुख, सह आयुक्त प्रसाद सुर्वे व विभागीय उप आयुक्त सागर धोमकर यांच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आली. प्रथम शिक्रापूर (ता. शिरूर, जि. पुणे) येथे छापा टाकून गोवा आणि कर्नाटक राज्य विक्री परवानाधारक मद्यसाठा जप्त करण्यात आला. तपासादरम्यान मिळालेल्या माहितीनुसार धुळे जिल्ह्यातील मुंबई-आग्रा महामार्ग परिसरातून एक कंटेनर ताब्यात घेण्यात आला. त्यामध्ये बिअर आणि मद्याच्या ६९६ बॉक्सचा साठा आढळून आला. यामध्ये एकूण सुमारे रु. ८१ लाख २७ हजार ६०० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पुढील तपासात सांगली जिल्ह्यात महाराष्ट्र-कर्नाटक सीमेजवळ आणखी एक कंटेनर पकडण्यात आला. त्यात विविध राज्यांसाठी विक्री परवानगी असलेले मद्याचे १ हजार २६ बॉक्स आढळून आले. वाहनांवर बनावट नंबर प्लेटचा वापर केल्याचेही निष्पन्न झाले. यामध्ये एकूण सुमारे रु. १ कोटी २१ लाख ९९ हजार ६००/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणात महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून सुरू आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाने नागरिकांना अवैध मद्यनिर्मिती, वाहतूक किंवा विक्रीबाबत माहिती मिळाल्यास टोल फ्री क्रमांक १८०० ८३३ ३३३३ किंवा व्हॉट्सॲप क्रमांक ८४२२००११३३ वर माहिती देण्याचे आवाहन केले आहे.

## पुणे शहर वाहतूक शाखेकडून ७३९ वाहनांचा ई-लिलाव

**पुणे । प्रतिनिधी**

पोलीस आयुक्त पुणे शहर अमितेश कुमार यांच्या आदेशान्वये शहरातील बिनधनी,बेवारस वाहने हटविण्याची विशेष मोहीम राबवून वाहतूक शाखेअंतर्गत ११ पोलीस स्टेशनकडील ३६६ व वाहतूक शाखेकडील ३७३ अशी एकूण ७३९ वाहनांचा ई-लिलाव करण्यात आला, याद्वारे ५० लाख १० हजार १२८ रुपये इतकी रक्कम शासन जमा होणार आहे, अशी माहिती पुणे शहर वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त डॉ. संदीप भाजीभाकरे यांनी दिली आहे. शहरात मोठ्या प्रमाणावर बिनधनी वाहने अनेक वर्षापासून पडून असल्याने नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत होता. याबाबींचा विचार करता पोलीस आयुक्त यांनी या वाहनांची कायदेशीर विल्हेवाट प्रक्रिया राबविण्याचे आदेश दिले होते.

वाहतुक शाखेने शहरातील विविध रस्त्यांवरील बेवारस वाहनांची माहिती संकलित करून योग्य नियोजनाद्वारे ती वाहने जमा केली. तसेच वाहनांच्या मालकांचा शोध घेण्यासाठी वृत्तपत्रामध्ये प्रसिद्धी, जाहीरनामे व जमा केलेल्या वाहनांचे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून मुल्यांकन इत्यादीबाबत विशेष मोहीम राबविण्यात आली. ज्या वाहनांचे मालक उपलब्ध झाले, त्यांना त्यांची वाहने परत करण्यात आली. तसेच मालक न मिळालेल्या वाहनांबाबत न्यायालयाकडून नाश करण्याचे आदेश प्राप्त करण्यात आले. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम ८७ अन्वये काही वाहनांच्या लिलावास अंतिम मंजुरी देण्यात आली. त्यानुसार मेटल स्क्रॅप ट्रेड कॉर्पोरेशन लिमिटेड या केंद्र शासन संलग्न संस्थेमार्फत २० मे रोजी लिलाव प्रक्रिया करण्यात आली. या कामी आयुक्तालयातील सर्व संबंधित वरिष्ठ अधिकारी तसेच वाहतूक विभागाचे प्रभारी अधिकारी, पोलीस ठाण्याचे अधिकाऱ्यांचे योगदान लाभले आहे.

या प्रक्रियेमुळे शहरातील बेवारस वाहनांची समस्या अंशतः कमी झाली असून, यापुढेही वाहतूक विभाग अशा प्रक्रिया राबविणार आहे. नागरिकांनी रस्त्यावर बरेच कालावधी पासून बेवारस स्थितीत उभ्या असलेल्या, वाहतुकीस अडथळा करणाऱ्या व परिणामी वाहतुकीचा वेग मंदावण्यास कारणीभूत ठरणाऱ्या बेवारस वाहनांची माहिती पी.टी.पी ॲपद्वारे वाहतुक विभागास कळवावी, तसेच अडथळेमुक्त, सुरक्षित व परिणामी वाहतुकीचा वेग वाढविण्यास सहकार्य करावे, असे आवाहन डॉ. भाजीभाकरे यांनी केले आहे.

## कांद्याला हमीभावासाठी शेतकरी आक्रमक; चांदवडमध्ये महामोर्चाला उग्र वळण

**नाशिक । प्रतिनिधी**

कांद्याला योग्य हमीभाव मिळावा अशी उत्पादकांची मागणी असून शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी नाशिकच्या चांदवड येथे शेतकरी क्रांती महामोर्चा काढण्यात आला. मविआच्या अनेक नेत्यांसह शेकडो उत्पादक, एसतकरी या आंदोलनात सहभागी झाले आहेत. सकाळपासून सुरू झालेल्या या मोर्चात अनेक मागण्या करण्यात आल्या. आंदोलकांनी महामार्ग रोखून धरत तेथील गाड्यांची हवा काढण्याचा प्रयत्न केला आणि बघता बघता या आंदोलनाला आक्रमक वळण मिळाले.



त्यानंतर महामार्गावर बंदोबस्ताला असलेल्या पोलिसांनी या आंदोलकांची सरळ धरपकड सुरू केली. या क्रांती महामोर्चात शिवसेनेचे अंबादास दानवे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे शशिकांत शिंदे यासह खासदार भास्कर भगरे, राजाभाऊ वाजे, निलेश लंके, शोभाताई बच्छाव हेही उपस्थित होते.

गळ्यात कांद्यांच्या माळा घालून, जोरदार घोषणाबाजी करत हे आंदोलन सुरू होतं. कांद्याला समाधानकारक हमीभाव मिळावा यासाठी काढण्यात आलेल्या या मोर्चात आंदोलकांनी मुंबई-आग्रा महामार्ग रोखून धरण्याचा, अडवण्याचा प्रयत्न केला. अखेर पोलिसांनी आंदोलकांची धरपकड सुरू केली. हर्षवर्धन सपकाळ, रोहित पवार, अंबादास दानवे यांना जबरदस्तीने पोलिस व्हॅनमध्ये बसवण्यात आलं. मात्र आम्हाला पोलिसांनी जरी ताब्यात घेतलं तरी देखील आम्ही आणखीन करणारच , असा निर्धार या मोर्चेकरांनी व्यक्त केला.

आमचं एवढंच म्हणणं होतं, या शासनाचं शेतकऱ्यांकडे लक्ष जात नाही. पण यात शासनाचं लक्ष आलं पाहिजे. यासाठी आम्ही प्रयत्न करायला गेलो, तर मी असेन, शशिकांत शिंदे असतो, हर्षवर्धन सपकाळ असोत, अंबादास दानवे आहेत, आम्हाला जर अशा पद्धतीने ताब्यात घेतलं असेल तर हा लोकशाहीचा घात आहे. पण हे आंदोलन इथेच संपलं असं नाही, हे वाढवावं लागेल, असं रोहित पवार म्हणाले. सामान्य लोक सिस्टीम विरोधात जर उतरले नाहीत, तर हे सरकार त्याच सामान्य लोकांचे हाल करेल अशी टीकाही रोहित पवार यांनी केली.

ये सरकार हमसे डरती है, पुलिस को आगे करती है.. शेतकऱ्यांच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी सरकार तयार नाही. सरकारने दिलेलं आश्वासन जे आहे, ते पाळायलाही ते तयार नाहीत. आणि जाब विचारणाऱ्यांना, सत्याग्रहींना पोलिस ताब्यात घेऊन कारवाई करत आहे, अशी टीका हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

चांदवड इथं शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी कांदा उत्पादक शेतकरी क्रांती महामोर्चा काढण्यात आलं. आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली नऊ वाजता मुंबई-आग्रा महामार्गावर क्रांती महामोर्चाचं आयोजन करण्यात आलं होतं. तीन हजार रुपये दराने शासकीय कांद्याची खरेदी करा, विक्री झालेल्या कांद्याला पंधराशे रुपये अनुदान द्या, अशा प्रमुख मागण्या शेतकऱ्यांच्या आहेत.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा २३० कोटींहून अधिक मालमत्ता कर वसूल

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये १ एप्रिल २०२६ ते २६ मे २०२६ (दुपारी १२ वाजेपर्यंत) या कालावधीत २३० कोटींहून अधिक मालमत्ता कर वसूल केला आहे.आतापर्यंत शहरातील २ लाख ३२ हजार ३८५ मिळकतधारकांनी मालमत्ता कराचा भरणा केला असून, उर्वरित मालमत्ताधारकांनी लवकरात लवकर मालमत्ता कर भरावा, असे आवाहन उपायुक्त सचिन पवार यांनी केले आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेकडून ३० जून २०२६ पूर्वी मालमत्ता कर भरणाऱ्या नागरिकांसाठी विविध सवलती लागू करण्यात आल्या असून, त्याला शहरवासीयांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत २ लाख ८ हजार ५७० नागरिकांनी ऑनलाइन पद्धतीने मालमत्ता कर भरून १० टक्के सवलतीचा लाभ घेतला आहे. या नागरिकांकडून २१२ कोटी रुपयांहून अधिक मालमत्ता कराचा भरणा डिजिटल माध्यमातून करण्यात आला आहे. डिजिटल माध्यमातून कर भरण्याचे प्रमाण वाढत आहे.

पिंपरी चिंचवड शहरामध्ये निवासी, व्यावसायिक, औद्योगिक, मिश्र वापराच्या तसेच मोकळ्या जागांसह एकूण ७ लाख ४४ हजार ६३० नोंदणीकृत मालमत्ता आहेत. या सर्व मालमत्ताधारकांना चालू आर्थिक वर्षाचे कर देयक वेळेत उपलब्ध करून देण्यात येत आहे.

महापालिकेकडून महिलांच्या नावावरील मालमत्ता, दिव्यांग नागरिक,पर्यावरणपूरक निवासी गृहनिर्माण संस्थांसाठी विविध सवलती देण्यात येत आहेत. विशेषतः ऑनलाइन कर भरण्यास प्रोत्साहन देण्यासाठी १० टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात येत असल्याने मोठ्या प्रमाणात नागरिक डिजिटल पद्धतीचा वापर करत आहेत. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी महापालिकेच्या कार्यालयात प्रत्यक्ष गर्दी टाळून घरबसल्या ऑनलाइन माध्यमातून मालमत्ता कर भरावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांनी मालमत्ता कर वेळेत भरून महापालिकेच्या विकासकामांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला आहे, ही समाधानाची बाब आहे. ऑनलाइन कर भरणा आणि विविध सवलतींना मिळणारा प्रतिसाद नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास दर्शवितो. शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य सुविधा आणि इतर नागरी सेवांच्या बळकटीसाठी मालमत्ता कर हा महत्त्वाचा आर्थिक स्रोत आहे. ज्या नागरिकांनी अद्याप कर भरलेला नाही, त्यांनी ३० जूनपूर्वी कर भरून सवलतींचा लाभ घ्यावा तसेच पुढील कारवाई टाळावी.

- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये आतापर्यंत २३० कोटींहून अधिक मालमत्ता कर संकलित झाला असून, दोन लाखांहून अधिक मिळकतधारकांनी कर भरला आहे. विशेष म्हणजे, मोठ्या संख्येने नागरिकांनी ऑनलाइन माध्यमातून कर भरण्यास प्राधान्य दिले असून, त्यातून १० टक्के सवलतीचाही लाभ घेतला आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी महापालिकेत प्रत्यक्ष येण्याऐवजी सुरक्षित आणि सुलभ ऑनलाइन माध्यमातून मालमत्ता कर भरून वेळ, श्रम आणि गर्दी टाळावी. उर्वरित मालमत्ताधारकांपर्यंतही लवकरच देयके पोहोचविली जातील.

- सचिन पवार, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## संक्षिप्त

### वापरात नसलेल्या बोटींच्या पुनर्वापरासाठी प्रस्ताव सादर करा - मंत्री नितेश राणे

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील वापरात नसलेल्या बोटी आणि जहाजांच्या पुनर्वापरासाठी सक्षम यंत्रणा उभारणे ही काळाची गरज आहे. यामुळे पर्यावरणपूरक व्यवस्थापनास चालना मिळेलच, शिवाय स्क्रॅप प्रक्रियेतून महसूल निर्मितीचे नवीन मार्गही उपलब्ध होतील. विभागाच्या माध्यमातून या संपूर्ण प्रक्रियेचा सविस्तर अभ्यास करून प्रभावी धोरण आखण्यात येणार असल्याची माहिती मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिली.

मंत्रालयामध्ये जहाज पुर्नावापरासंदर्भात आयोजित बैठकीत मंत्री राणे बोलत होते. यावेळी महाराष्ट्र सागरी मंडळाचे अधिकारी आणि श्री राम हरित जहाज पुनर्वापर उद्योग (युनिट-२) एलएलपीचे प्रतिनिधीं उपस्थित होते. मंत्री राणे म्हणाले, राज्यातील वापरात नसलेल्या बोटी व जहाजांच्या पुनर्वापर प्रक्रियेला गती देण्यासाठी विभागामार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत. श्री राम हरित जहाज पुनर्वापर उद्योग (युनिट-२) एलएलपी यांनी राज्यातील वापरात नसलेल्या बोटी व जहाजांचा पुनर्वापर करण्याबाबत सविस्तर प्रस्ताव सादर करावा. विशेषतः इनलँड व्हेसल तसेच मोठ्या जहाजांसाठी एक खिडकी प्रणाली विकसित करण्याबाबत सकारात्मक विचार करण्यात यावा. यामुळे जहाज पुनर्वापर प्रक्रियेत सुलभता, पारदर्शकता आणि वेग वाढण्यास मदत होईल. या विषयावर विभागामार्फत सखोल अभ्यास करण्यात येईल व तो आगामी बोर्ड बैठकीत मांडण्यात येईल.

### मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी ५ लाखांची मदत वितरित

**मुंबई । प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यातील धानिवरी येथे १८ मे रोजी झालेल्या भीषण अपघातात मृत्यू झालेल्या १३ नागरिकांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मान्यतेनंतर एकूण ६५ लाख रुपयांच्या मदतीची रक्कम जिल्हाधिकारी, पालघर यांच्या खात्यात वर्ग करण्यात आली आहे. घटनेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मृतांच्या वारसांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली होती. त्यानुसार मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत वितरित करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून संबंधित प्रशासकीय आदेशही जारी करण्यात आले आहेत. १८ मे २०२६ रोजी दुपारी सुमारे चार वाजण्याच्या दरम्यान डहाणू तालुक्यातील धानिवरी परिसरात टेम्पो आणि कंटेनरची समोरासमोर भीषण धडक होऊन मोठा अपघात झाला होता. अपघात इतका गंभीर होता की टेम्पोचा पूर्ण चुराडा झाला. या दुर्घटनेत १३ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर १७ जण जखमी झाले होते. घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन, पोलीस आणि आरोग्य विभागाच्या पथकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदत व बचावकार्य सुरू केले. जखमींना त्वरित जवळील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांनी मृतांच्या वारसांना आर्थिक मदत देण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर केला होता. त्यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत देण्यास तातडीने मंजुरी दिली. या प्रकरणी मृतांच्या वारसांची पडताळणी करून मंजूर मदत तातडीने वितरित करण्याबाबत जिल्हा प्रशासनास निर्देश देण्यात आले आहेत.या अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये सुरेश रत्ना लाखात (वय ४७), पांडू गणपत लाखात (वय ४५), कलु गोविंद लाखात (४८), सुनील अर्जुन दांडेकर (वय ३५), चिमा गोविंद कुन्हाडा (वय ७५), नमिता विठ्ठल दांडेकर (वय १४), सारीका संतोष लाखात (वय ३८), आयुष्य सिताराम लाखात (वय १६), सागर नामदेव शेंडे (वय १५), वसंत शिवराम वळवी (वय ४०), सलोनी शिवराम वळवी (वय १२), अजय चंदर आहाडी (वय १९) आणि रियांशी संतोष लाखात (वय ४) सर्व राहणार बापूगाव यांचा समावेश आहे.

# मान्सून पूर्वतयारीसाठी जिल्हा प्रशासन सज्ज

## मोती तलाव येथे आपत्कालीन शोध व बचाव साहित्याची रंगीत तालीम संपन्न

**जालना । प्रतिनिधी**

आगामी मान्सून कालावधीच्या पार्श्वभूमीवर संभाव्य आपत्कालीन परिस्थितीला तात्काळ व प्रभावी प्रतिसाद देता यावा, तसेच आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम व सज्ज राहावी यासाठी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आशिमा मित्तल यांच्या निर्देशानुसार व जालना शहर महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण शशिकांत हदगल यांच्या मार्गदर्शनाखाली जालना शहरातील मोती तलाव येथील विसर्जन कुंड परिसरात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग व अग्निशमन विभाग, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आपत्कालीन शोध व बचाव साहित्याची भव्य रंगीत तालीम आयोजित करण्यात आली होती.

यावेळी जिल्हाधिकारीआशिमा मित्तल, मनपा आयुक्त अंजली शर्मा, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी दिपक काजळकर तसेच अग्निशमन अधिकारी संदीप दराडे यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय अग्निशमन विभाग, जालना, बदनापूर व अंबड येथील अधिकारी व कर्मचारी, तसेच रायगड येथे प्रशिक्षण पूर्ण करून आलेले ‘आपदा मित्र’ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

रंगीत तालीमेदरम्यान पूर, अतिवृष्टी, पाण्यात अडकलेल्या नागरिकांचा बचाव, आपत्कालीन स्थलांतरण तसेच नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी वापरण्यात येणाऱ्या अत्याधुनिक शोध व बचाव साहित्यांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. यामध्ये फायबर बोट, इन्फ्लाटेबल रबर बोट, स्कुबा सेट, फायर जेल ब्लँकेट, लाईफबोये, बॅटरी कटर, बॅटरी स्प्रेडर, फ्लोटींग पंप, पोर्टेबल जनरेटर, पोर्टेबल पंप,




मेगाफोन, सेफ्टी नेट, लाईफ जॅकेट व रिफ्लेक्टर जॅकेट आदी साहित्यांच्या कार्यपद्धती व वापराबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच पाण्यात बुडणाऱ्या व्यक्तीचा सुरक्षितरित्या बचाव कसा करावा, पूरस्थितीत रबर बोटीद्वारे नागरिकांचे स्थलांतरण कशा पद्धतीने करावे, आपत्कालीन परिस्थितीत समन्वय साधून तात्काळ प्रतिसाद कसा द्यावा याबाबत अग्निशमन विभागामार्फत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण देण्यात आले.

मान्सून कालावधीत उद्भवणाऱ्या संभाव्य नैसर्गिक आपत्तींचा प्रभाव कमी करण्यासाठी तसेच नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात येत असून, अशा प्रकारच्या रंगीत तालीम व प्रशिक्षण उपक्रमांमुळे आपत्ती प्रतिसाद यंत्रणांमध्ये समन्वय, तत्परता व कार्यक्षमता अधिक बळकट होत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

## अपघातग्रस्त कामगारांच्या प्रत्यारोपण शस्त्रक्रियांसाठी तातडीच्या उपाययोजना करा - मंत्री आकाश फुंडकर

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील कारखान्यांमध्ये आणि औद्योगिक कंपन्यांमध्ये मशीनवर काम करताना अपघात होऊन हात गमावावा लागलेल्या कामगारांना पुन्हा पूर्ववत आयुष्य जगता यावे. अपघातग्रस्त कामगारांवर तातडीने शस्त्रक्रिया करून त्यांचे तुटलेले हात पुन्हा प्रत्यारोपित करण्यासाठी तातडीच्या उपाययोजना करण्यात याव्यात, असे निर्देश कामगार मंत्री ड. आकाश फुंडकर यांनी दिले. या संदर्भातील प्रायोगिक तत्वावर पुणे जिल्ह्यातील औद्योगिक आस्थापनांमध्ये उपक्रम राबविण्यात यावा, अशा सूचनाही कामगार मंत्री ड. फुंडकर यांनी दिल्या.



याबाबत नरिमन भवन येथे आयोजित बैठकीत मंत्री ड. फुंडकर बोलत होते. बैठकीस दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ उपस्थित होत्या. तर प्रत्यक्षरित्या अपर मुख्य सचिव आय. ए. कुंदन, कामगार आयुक्त एच. पी तुम्मोड, उपसचिव दीपक पोकळे उपस्थित होते.

अपघात झाल्यास पहिल्या काही तासांचा अवधी अत्यंत महत्वाचा असतो. त्यामुळे हात प्रत्यारोपण करणाऱ्या तज्ज्ञ डॉक्टरांची अद्ययावत माहिती सर्व कारखाने आणि औद्योगिक आस्थापनांमध्ये असणे अनिवार्य करण्यात यावे, जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीत कामगारांना तातडीने मदत मिळेल. कामगारांना किंवा व्यवस्थापनाला अपघाताच्या वेळी त्वरित संपर्क साधता यावा आणि पुढील वैद्यकीय मार्गदर्शनासाठी दिशा मिळावी, यासाठी ‘हेल्पलाईन क्रमांक’ जारी करण्यात यावा, अशा सूचनाही कामगार मंत्री ड फुंडकर यांनी दिल्या.

## लोकनेते स्व. विलासराव देशमुख साहेब यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

**जालना । प्रतिनिधी**



आज मंगळवार दिनांक २६ मे २०२६ रोजी जालना लोकसभेचे खासदार डॉ. कल्याण काळे साहेब यांच्या कार्यालयात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, मराठवाड्याचे भूमिपुत्र व लोकनेते स्व. विलासराव देशमुख साहेब यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी स्व. विलासराव देशमुख साहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. महाराष्ट्राच्या राजकारणात तसेच ग्रामीण विकास, शिक्षण, उद्योग, प्रशासन आणि सर्वसामान्य जनतेसाठी त्यांनी दिलेले योगदान अतुलनीय असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. मराठवाड्याच्या विकासासाठी स्व. देशमुख साहेबांनी केलेले कार्य कायम प्रेरणादायी राहील, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

या प्रसंगी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. कल्याण दळे, श्री. राजेंद्र राख, बदर भाई चाऊस, शहराध्यक्ष डॉ. विशाल धानोरे, इकबाल कुरेशी, बाशीत कुरेशी, संजय मुथा, संजय इंगळे, कृष्णा पडूळ, अजय बनकर, शेख इब्राहिम, नारायण वाढेकर, कल्याण तारडे, राजेंद्र गोरे, बाबासाहेब सोनवणे, दिनेश सुराणा, वसीम शेख, रघुवीर गुढे, सूरज यलगंटवार, गौतम लांडगे, हाजी आसिफ मोमीन, युनुस हुसेन शेख, चंद्रकांत रत्नपारखे, योगेश कदम, दिग्विजय धांडगे, दिलीप चव्हाण व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थितांनी स्व. विलासराव देशमुख साहेब यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प व्यक्त केला.

## विद्यार्थ्यांचे, १२ वी समकक्षता परीक्षेत घवघवीत यश, संस्थेचा निकाल ८४.५१%




**जालना । प्रतिनिधी**

शासनाने आय टी आय मधील व्यवसाय अभ्यासक्रमांना, इ. बारावीची समकक्षता दिलेली असून त्याकरिता मराठी व इंग्रजी हे विषय उत्तीर्ण होणे अनिवार्य केले आहे.

नुकत्याच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या इयत्ता १२ वी परीक्षेच्या निकालात, संस्थेचा निकाल ८४.५१% लागला असून परीक्षेत बसलेल्या एकूण ७१ विद्यार्थी पैकी ६० विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत.

त्यामध्ये संस्थेतील ऋषिकेश आंबावले (मोटार मेकॅनिकल ट्रेड) ८१.६७ % , सार्थक कुमकर ( मोटार मेकॅनिकल ट्रेड) ७८.५० %, निशित सुरवसे (मोटार मेकॅनिकल ट्रेड) ७४.५० % अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेले आहेत. त्यांच्या यशामध्ये निदेशक अमोल शिंदे, गटनिदेशक( सेवानिवृत्त) राजकुमार तिकोणे यांचे मार्गदर्शन असून संस्थेमार्फत निदेशक विक्रम काळोखे, मुख्य लिपिक विजय भैलुमे व लिपिक विजय चावरिया यांनी संपूर्ण कामकाज पाहिले.

प्राचार्य शशिकांत पाटील यांनी प्रोत्साहन पर बक्षीस देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## खेड ग्रामपंचायतीच्या सरपंचांवर मोठी कारवाई; लता फरांदे अखेर निलंबित

**पुणे । प्रतिनिधी**

खेड ग्रामपंचायतीच्या सरपंच लता फरांदे यांच्यावर अखेर प्रशासकीय कारवाईचा मोठा बडगा उगारण्यात आला आहे.

तब्बल पावणे सतरा लाखांच्या आर्थिक अनियमितता आणि गंभीर गैरव्यवहार प्रकरणी पुणे विभागीय आयुक्त कार्यालयात सुनावणी पार पडली. या सुनावणीत त्यांना सरपंच पदावरुन निलंबित करण्याचा अंतिम आदेश जारी करण्यात आला आहे. या कारवाईमुळं खेडसह संपूर्ण तालुक्यात राजकीय खळबळ उडाली आहे.



खेड ग्रामपंचायतीमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार आणि अधिकारांचा गैरवापर होत असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी आणि विरोधकांनी प्रशासनाकडे केल्या होत्या. या तक्रारींची दखल घेत जिल्हा परिषद आणि पंचायत समिती स्तरावर या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली होती.

प्राथमिक तपास आणि त्यानंतर सादर करण्यात आलेल्या

फेरचौकशी अहवालात सरपंचांवर ठेवण्यात आलेले काही आरोप अत्यंत गंभीर स्वरूपाचे असल्याचे सिद्ध झाले असून तक्रारदारांनी सरपंच यांच्यावर झालेल्या या कारवाईमुळे राजकीय क्षेत्रात चांगलीच खळबळ उडाली आहे.

## बार्शीत दिवसाढवळ्या पत्नीची निर्घृण हत्या

**सोलापूर । प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यातील बार्शीत धक्कादायक घटना घडली आहे. दिवसाढवळ्या पत्नीची चाकूने वार करत हत्या केल्याची घटना घडली आहे. हत्या करून आरोपी पती स्वतःहून पोलिस ठाण्यात हजर झाला आहे. बार्शी शहराजवळील बार्शी-परंडा रोडवर आज दुपारी ही घटना घडली आहे.

या घटनेनं बार्शी शहरात खळबळ उडाली आहे.

दरम्यान, कौटुंबिक करणातून पती-पत्नीमध्ये वाद झाला होता. त्यानंतर आरोपी ऋषिकेश पाटील याने आपल्या पत्नी धनश्री पाटील हिची भररस्त्यात चाकूने निर्घृण हत्या केली. वाद चिघळताच संतापाच्या भरात ऋषिकेशने पत्नीवर चाकूने सपासप वार केले. या हल्ल्यात गंभीर





जखमी झालेल्या धनश्री पाटील हिचा जागीच मृत्यू झाला. ऋषिकेश आणि धनश्री हे दोघेही खाजगी बँकेमध्ये काम करत होते. याप्रकरणी बार्शी पोलिसांत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू असून आरोपी ऋषिकेश पोलिसांच्या ताब्यात आहे.

# सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या नावाने सायबर फसवणूक; बनावट अकाउंटद्वारे पैशांची मागणी

**सोलापूर । प्रतिनिधी**

सायबर गुन्हेगारीच्या घटना सातत्याने वाढत असल्यानेच सायबर विभागही सतर्क झाला आहे. युपीआय पेमेंट असेल किंवा ऑनलाईन बँकींग प्रक्रियेतील पैशांची देवाण-घेवाणबाबत सातत्याने नागरिकांना सावधान करण्यात येते. मात्र, तरीही डिजिटल अरेस्ट किंवा सोशल मिडिया अकाऊंट हॅक करुन मोबाईल चॅटद्वारे इमोशनल मेसेज पाठवून पैशांची मागणी केली जात असल्याचे प्रकार सर्रास घडत आहेत. विशेष म्हणजे, चक्क जिल्हाधिकाऱ्यांनाही या फ्रॉडचा सामना करावा लागल्याची घटना उघडकीस आली आहे. सोलापूरचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी कार्तीकेयन एस. यांच्या नावाने व्हिएतनाम व थायलंड या देशातून नाव, पदनाम व छायाचित्र वापरून बनावट सोशल मीडिया खाते तयार करुनन नागरिकांची दिशाभूल करण्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांच्या सोशल मीडियात खात्यामार्फत काही व्यक्तींना पैशांची मागणी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले असून प्रशासनाने याची गंभीर दखल घेतली आहे. जिल्हाधिकारी यांनी स्वतः सायबर सेल येथे या अनुषंगाने तक्रार दाखल केली असून पोलीस विभागाच्या सायबर सेल मार्फत गुन्ह्याची तपासणी सुरू झालेली आहे. याबाबत जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी स्पष्ट केले आहे की, आपल्याकडून तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अशा प्रकारे कोणत्याही नागरिकांकडून आर्थिक व्यवहार किंवा मागणी केली जात नाही. बनावट खाते व




त्यावरील संदेशांमुळे नागरिकांची फसवणूक होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी अशा संदेशांना बळी पडू नये, तसेच कोणत्याही संशयास्पद संदेशांची त्वरित माहिती प्रशासनाला द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

दरम्यान, सदर बनावट खात्यात जिल्हाधिकाऱ्यांचे नाव, पदनाम व छायाचित्र वापरून विश्वासार्हता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. एका व्हॉट्सॲप प्रोफाईलवर Collector District Magistrate अशी नोंद करून नागरिकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. जिल्हा प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून अशा प्रकारच्या फसवणुकीविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट केले आहे.

दरम्यान, दोनच दिवसांपूर्वी साताऱ्यातील सायबर विभागाने मोठी कारवाई करत ऑनलाईन फ्रॉड करणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीला बेड्या ठोकल्या आहेत. त्यांच्याकडून अनेक मोबाईल, लॅपटॉप आणि रोकडही जप्त करण्यात आली होती. त्यातच, आता चक्क जिल्हाधिकाऱ्यांच्या बनावट अकाऊंटद्वारे पैशांची मागणी करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ज्योती मधुकर आडेकर यांनी डी.बी. कॉर्प लि. दिव्य मराठी, डी. १८१, शेंद्रा एम.आय.डी.सी. छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) - ४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून, कार्यालय दैनिक महिला संवाद, सी-२०३, अनंत पार्क, काळेवाडी रोड, राहटनी, धनगर बाबा मंदीराजवळ, पुणे शहर, पुणे - ४११०१७(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक : ज्योती मधुकर आडेकर, मो. नं. ९१६८५६७१११, कार्यकारी संपादक : विद्या जाधव, उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड,
मेल आयडी - mahilasanvad11@gmail.com, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - **MHMAR/25/A1224**

Printer, Publisher & Owner Jyoti Madhukar Adekar, Printed At D. B. Corp Ltd., Divya Marathi, D 181, SHENDRA MIIDC Chatrapati Sambhaji Nagar (AURANGABAD) - 431003(Maharashtra), And Published At Office Daily Mahila Sanvad C-203, Anant Park, Kalevadi Road, Rahatni, Near Dhangar Baba Mandir, Pune City, Pune -411017 (Maharashtra), Editor : Jyoti Madhukar Adekar, Mob. No. 9168567111, Executive Editor : Vidya Jadhav, Deputy Editor : Sau. Sunanda Raju Nikrad, E-Mail : mahilasanvad11@gmail.com **PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224**